झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा-१/ भवानी पेठ/७०६२/२०२२
दिनांक :०३/१०/२०२२

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश
### ( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना )

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास)अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख या पुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्व साधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगर पालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद भवानी पेठ येथील सि.स.नं. ८३०, भवानी पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ७५००.०० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख या पुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी सदर क्षेत्रातील झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन विकसक मे. स्पायर व्हेंचर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे;आणि

ज्याअर्थी सहा. आयुक्त, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगर पालिका, पुणे यांचेकडील सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल दि.२३/१२/२०२१ इकडे सादर केला आहे व उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. ०१, झोपडपट्टी प्राधिकरण पुणे यांनी दि. ३०/०९/२०२२ रोजी समक्ष पाहणी करून सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य अहवाल विचारात घेता सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांची खात्री पटली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र हे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादी मध्ये पुर्णत: समाविष्ट करणेत आले आहे; आणि

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती/शासकिय विभाग/ सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांना असे सूचित करण्यात येते की, त्यानी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना/आक्षेप/हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी.विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे आणि

सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

उपरोक्त विहीत मुदतीत मालकी हक्कप्राप्त असलेल्या खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांचेकडून प्राप्त आक्षेप / हरकती / सूचना / दावे या वर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबाबत व अधिसूचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. असा निर्णय मा.उच्चस्तरीय तक्रार निवारण समिती,बांद्रे, मुंबई यांच्याकडे दाखल त्यावरील कोणत्याही अपिलातील निर्णयास अधिनराहुन अंतिम असेल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** सि.स.नं. ८३०, भवानी पेठ, पुणे

**महानगर पालिका क्षेत्र :** पुणे

| पेठ / गाव / नगर रचना योजना | स.नं. / सि.स.नं. / अंतिम भूखंड क्र. | जमीनीचे मालकी हक्क/ विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ.मी.) अंशत: / पूर्णत: (अंदाजे) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| भवानी पेठ | सि.स.नं. ८३० | खाजगी | ७५००.०० चौ.मी. | पुर्वेस - लागू न.भु. क्र. ८२४ पै<br>पश्चिमेस - लागू न.भु. क्र. ८३१,८३६,८३७,८३८ पै<br>दक्षिणेस- ८२६,८२७, ८२८,८२९ पै भवानी माता मंदिर व लागू रस्ता<br>उत्तरेस - लागू न.भु. क्र. ८४२,८४४,८४५,८४६ पै | सि.स.नं. ८३० पैकी भवानी माता मंदिर नगारखाना परिसर वगळून उर्वरित क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेचे प्रस्तावित करणेत येत आहे |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**दिनांक**:- ०३ /१० /२०२२

3.10.22

राजेंद्र निंबाळकर (भा. प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

O/C

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे

१. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते कि या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा

२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना गवनि / झोनिपू विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

३. व्यस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६, वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयासदेयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती

४. विकसक मे. स्पायर व्हेंचर्स, ६९३,नाना पेठ,कुदळे पार्क, HDFC बँक पुढे, क्वार्टर गेट, पुणे-४११०४२